# प्रकरण सहावे

## सारांश व शिफारसी

## प्रकरण सहावे

## सारांश व शिफारसी

### सारांश :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेचा अभ्यास पाच टप्प्यामध्ये केलेला आहे. पहिल्या टप्प्यामध्ये भारतातील सहकारी चळवळीचा इतिहास आणि सेवा सहकारी संस्थांची माहिती दिली आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेच्या अभ्यासाचे तीन विभाग तयार केले आहेत. पहिल्या विभागामध्ये संस्थेच्या स्थापनेचा इतिहास दिलेला आहे. तर दुसऱ्या विभागामध्ये १९४६ ते १९७५-७६ या काळातील संस्थेच्या प्रगतीची माहिती दिलेली आहे तर तिसऱ्या विभागामध्ये १९७६-७७ ते १९७९-८० या काळातील संस्थेच्या प्रगतीची माहिती दिलेली आहे. तर तिसऱ्या टप्प्यामध्ये १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या प्रगतीची माहिती दिलेली आहे. तर चोथ्या टप्प्यामध्ये १९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेची भांडवली रचना व कर्ज पुरवठयाची रचना दिलेली आहे.आणि पाचव्या टप्प्यामध्ये संस्था कर्ज पुरवठया व्यतिरिक्त जी इतर कार्ये व उपक्रम राबवित आहे त्या. बाबतची माहिती दिलेली आहे.

१९४६ साली कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्थेची स्थापना झाली. १९४६ पासून ते १९७५-७६ या काळातील संस्थेचा अभ्यास केल्यानंतर काही महत्वाचे निष्कर्ष निघतात. ते निष्कर्ष पुढीलप्रमाणे. १९४६ पासून १९७५-७६ पर्यन्त १९६४-६५ हे वर्ष वगळता प्रत्येक वर्षी संस्थेच्या सभासद संख्येमध्ये वाढ झालेली आहे. तसेच भाग भांडवलाचा विचार केल्यास १९४६ पासून १९७५-७६ पर्यन्त भाग भांडवलात सातत्याने वाढ होत गेलेली आहे. १९७३-७४ पर्यन्त संस्थेकडील सभासद व बिगर सभासदांच्या ठेवीचे प्रमाण कमी आहे. परंतु १९७४-७५ पासून ठेवीमध्ये जास्त वाढ झालेली आहे. या कालखंडामध्ये संस्थेच्या एकूण

निधीमध्ये सातत्याने दरवर्षी वाढ झालेली आहे. १९४६ ते १९७५-७६ या काळात संस्थेने बँकेकडून घेतलेल्या कर्जात चढउतार झालेले आहेत. त्याचप्रमाणे या काळातील संस्थेच्या खेळत्या भाग भांडवलाच्या प्रमाणातही चढउतार झालेला आहे. काही वर्षी खेळते भाग भांडवल वाढलेले आहे तर काही वर्षी खेळत्या भाग भांडवलामध्ये घट झालेली आहे. १९४६ ते १९७५-७६ या काळात १९६४-६५ व १९६५-६६ ही दोन वर्षे वगळता इतर वर्षी संस्थेला नफा झालेला आहे. परंतु नफ्याच्या प्रमाणात चढउतार झालेला आहे. या काळात संस्थेने सभासदांना केलेल्या कर्ज पुरवठ्यातही चढउतार झालेला आहे. १९४६ ते १९७५-७६ या काळामध्ये संस्थेच्या थकबाकीचा विचार केल्यास थकबाकीचे प्रमाण हे जास्त आहे. त्यामुळे संस्थेला समाधानकारक ऑडीट वर्ग मिळालेला नाही. काही वर्षी ऑडीट वर्ग ब आहे तर काही वर्षी क आहे.

दुसऱ्या टप्प्यात विभाग तीन मध्ये १९७६-७७ ते १९७९-८० या कालावधीतील संस्थेच्या प्रगतीचा अभ्यास केलेला आहे. या काळातील अभ्यासावरून संस्थेच्या प्रगतीबाबत काही निष्कर्ष मिळतात ते पुढील प्रमाणे.

१९७६-७७ ते १९७९-८० या काळात संस्थेच्या सभासद संख्येत सातत्याने दरवर्षी वाढ झालेली आहे. भाग भांडवलामध्ये सुध्दा वाढ झालेली आहे. परंतु संस्थेने केलेल्या खत खरेदीमध्ये चढउतार झालेला आहे. संस्थेने सभासदांना केलेल्या खत विक्रीमध्येही चढउतार झालेला आहे. या कालखंडात संस्थेच्या राखीव निधी व इतर निधीच्या प्रमाणात मात्र दरवर्षी सातत्याने वाढ झालेली आहे. संस्थेने जे बँक कर्ज घेतलेले आहे. त्यामध्ये चढउतार झालेले आहेत. संस्थेने सभासदांना दिलेल्या कर्जाच्या प्रमाणातही चढउतार झालेला आहे. या काळात संस्थेला नफा झालेला आहे. परंतु नफ्याच्या प्रमाणात चढउतार झालेले आहेत. संस्थेने केलेल्या एकूण उलाढालीचा विचार केल्यास १९७६-७७ ते १९७९-८० या काळात

१९७८-७९ हे वर्ष वगळता इतर वर्षी ठेवीत व उलाढाली मध्ये वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे १९७९-८० हे वर्ष वगळता इतर वर्षी संस्थेच्या खेळत्या भाग भांडवलामध्ये वाढ झालेली आहे. परंतु संस्थेचे या काळातील थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. तरी परंतु थकबाकीचे प्रमाण कमी होत आहे. संस्थेला १९७६-७७ मध्ये मिळालेला ऑडिट वर्ग ` क ` आहे. नंतरच्या वर्षी तो ` ब ` वर्ग मिळालेला आहे. थोडक्यात या कालखंडात संस्थेची प्रगती झालेली आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या प्रगतीचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, या काळामध्ये संस्थेची प्रगती झालेली आहे. परंतु ती प्रगती समाधानकारक नाही. कारण संस्थेचे या काळातील थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. कर्ज वसुलीचे प्रमाण कमी आहे. या कालखंडात संस्थेने सभासदांच्या व इतर लोकांच्या सोयीसाठी भांडी विभाग सुरू केलेला आहे. त्याचप्रमाणे गूळ आवक स्पर्धा व ऊस टनेज उत्पादक स्पर्धा हे उपक्रम सुरू केलेले आहेत.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेची प्रगती पुढील प्रमाणे मांडता येईल.

तक्ता क्र. ६.१

| अनु. | दर्शक | सरासरी वार्षिक वृध्दी दर |
|---|---|---|
| १. | सभासद संख्या | ३.११ |
| २. | भाग भांडवल | ९.११ |
| ३. | खत खरेदी | १०.६३ |
| ४. | खत विक्री | १०.५६ |
| ५. | राखीव निधी व इतर निधी | ९.८८ |
| ६. | बँक कर्ज | ६.८८ |
| ७. | सभासद कर्ज | ७.९२ |
| ८. | शेअर्स व गुंतवणूक | ८.९० |
| ९. | नफा | २४.७६ |
| १०. | देवघेव व उलाढाल | ९.०७ |
| ११. | खेळते भांडवल | ७.८७ |
| १२. | थकबाकी | ६.१२ |
| १३. | डिव्हिडंड | ११.७४ |

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळात सभासद संख्या सातत्याने वाढली आहे. भाग भांडवलामध्ये सुध्दा सातत्याने वाढ झालेली आहे. परंतु खत खरेदी व खत विक्रीच्या प्रमाणात चढउतार झालेला आहे. राखीव निधी व इतर निधीमध्ये सातत्याने दरवर्षी वाढ झालेली आहे. बँक कर्जाच्या प्रमाणात चढउतार झालेला आहे. सभासद कर्जामध्ये चढउतार झालेला आहे. या कालखंडात नफ्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

परंतु थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे या कालखंडात १९८३-८४ ते १९८८-८९ मध्ये ` क ` वर्ग मिळालेला आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेची भांडवली रचना संस्थेच्या स्वतंत्र विकासाला पूरक व समर्थ आहे याचा पुरावा पुढील तक्त्यावरून मिळू शकतो.

तक्ता क्र. ६.२

संस्थेची भांडवली रचना

| अनु. | तपशील | १९८०-८१ | | १९९०-९१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम (रू.) | शेकडा प्रमाण | रक्कम (रू.) | शेकडा प्रमाण |
| १. | भाग भांडवल | २१९५००-०० | ३०.९८ | ५५४३६०-०० | ४१.३३ |
| २. | राखीव निधी | ६५३८९-४० | ९.२३ | १८३३३६-९२ | १३.६७ |
| ३. | बुडीत कर्ज निधी व इतर निधी | ३८०९३-३६ | ५.३८ | ७०७३४-३१ | ५.२७ |
| ४. | ठेवी | १५२१९-५० | २.१५ | ६०६९७-५० | ४.५३ |
| ५. | कर्ज उभारणी | ३३४६१५-९५ | ४७.२३ | ३१३८७४-०० | २३.४० |
| ६. | इतर एकूण | ३५५९४-५० | ५.०३ | १५८३३५-७८ | ११.८० |
| | एकूण : (१ ते ६) | ७०८४१२-७१ | १००.०० | १३४१३३८-५१ | १००.०० |

संस्थेच्या १९८०-८१ ते १९९०-९१ च्या भांडवली रचनेच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, या कालखंडात संस्थेच्या भाग भांडवल, राखीव निधी, बुडीत कर्ज निधी व इतर निधी आणि ठेवी यांच्या एकूण भांडवलातील प्रमाणामध्ये वाढ होत आहे तर एकूण भाग भांडवलातील कर्ज उभारणीचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे संस्था अर्थक्षम व स्वावलंबी बनत आहे.

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळातील संस्थेच्या कर्ज पुरवठयाच्या रचनेमध्ये अल्प मुदतीच्या कर्ज पुरवठयाचे प्रमाण हे नेहमीच जास्त आहे. तरी परंतु १९८०-८१ या वर्षीच्या तुलनेने १९९०-९१ मध्ये मध्यम मुदतीच्या कर्जाचे प्रमाण वाढलेले आहे. यावरून सभासद शेतकरी आपल्या शेत जमिनीमध्ये आधुनिक पध्दतीचा अवलंब करीत आहेत असा निष्कर्ष निघतो. कारण अल्प मुदतीच्या कर्जामध्ये शेतकरी सभासदांनी ट्रॅक्टर खरेदी, इलेक्ट्रिक मोटार खरेदी, सबमर्शिबल पंप खरेदी व गोबर गॅससाठी कर्जे घेतलेली आहेत. या काळातील संस्थेच्या कर्ज पुरवठयाची रचना तक्ता क्र. ६.३ वरून लक्षात येईल.

तक्ता क्र. ६.३

| अनु. कर्ज पुरवठयाचा प्रकार | १९८०-८१ | | १९९०-९१ | |
|---|---|---|---|---|
| | रक्कम (रु.) | शेकडा प्रमाण | रक्कम (रु.) | शेकडा प्रमाण |
| १. अल्प मुदत कर्ज | ४५३६१८-७३ | १००.०० | ८००३०८-९१ | ९७.१५ |
| २. मध्यम मुदत कर्ज | - | - | २३४८१-०० | २.८५ |
| ३. रूपांतरित कर्ज | - | - | - | - |
| एकूण : (१ ते ३) | ४५३६१८-७३ | १००.०० | ८२३७८९-९१ | १००.०० |

१९८०-८१ ते १९९०-९१ या काळामध्ये जो एकूण कर्ज पुरवठा केलेला आहे त्यामध्ये चढउतार झालेला आहे. तर १९८४-८५ मध्ये रु. १८,९५६-५० व १९८५-८६ मध्ये रु. १३,१४०-७० इतके रूपांतरित कर्ज दिलेले आहे.

शिफारसी :

कदमवाडी विविध कार्यकारी सहकारी (विकास) सेवा संस्था लि., कदमवाडी या संस्थेच्या केलेल्या अभ्यासावरून खालील शिफारसी मांडल्या आहेत.

१) संस्थेचे थकबाकीचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दिलेल्या कर्जाची जास्तीत जास्त प्रमाणात कर्ज वसूली करून थकबाकीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत त्यामुळे संस्थेला समाधानकारक ऑडीट वर्ग मिळेल. थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी संस्थेच्या संचालक मंडळाने सभासदांच्या बैठका घेऊन त्यांना थकबाकीचे दुष्परिणाम समजावून सांगावेत. वेळेत कर्जाची परतफेड केली नाही तर जादा व्याज द्यावे लागेल, परत नव्याने कर्ज घेत असताना अडचणी निर्माण होतील, सभासद म्हणून वेळेत कर्ज परतफेड करण्याची सभासदांची जबाबदारी आहे इत्यादी मुद्दे त्यांना समजावून द्यावेत.

२) थकबाकीचे प्रमाण कमी होऊन जास्तीत जास्त कर्जाची वसूली करण्यासाठी संस्थेच्या सभासदांचे शेती उत्पादन नियमितपणे व योग्य किंमतीस विकले जाण्याची सोय असणे आवश्यक आहे व या विक्रीशी संस्थात्मक पातळीवर कर्ज वसूलीचा संबंध प्रस्थापित करणे अत्यंत आवश्यक आहे.

३) संस्थेने स्वत:च्या मालकीच्या भांडवलामध्ये जास्तीत जास्त वाढ करण्यासाठी सभासद व बिगर सभासदांच्याकडून जास्तीत जास्त चालू, बचत, मुदत व आवर्ती ठेवी जमा करण्याचे प्रयत्न करावेत. त्यासाठी संस्थेच्या संचालकांनी आपल्या गल्लीतील लोकांना विश्वासात घेऊन त्यांना बचतीचे महत्त्व पटवून देऊन प्रत्येकाच्या आर्थिक कुवतीनुसार ठेवी ठेवण्यास प्रवृत्त करावे.

४) संस्था सद्या जे विभाग चालवीत आहे ते अधिक कार्यक्षमतेने चालवावेत व या शिवाय लोकांची सोय व्हावी यासाठी कापड विभाग औषध विभाग संस्थेमार्फत सुरू करावेत.

५) संस्थेने सभासद शेतक-यांनी जास्तीत जास्त उत्पादन वाढवावे व ते सहकारी यंत्रणेमार्फतच विकावे या दृष्टीने सभासद शेतक-यांना प्रोत्साहन देण्यासाठी जे ` गुळ आवक स्पर्धा ` व ` ऊस टनेज उत्पादक स्पर्धा ` सुरू केल्या होत्या व त्या बंद केलेल्या आहेत. तर या स्पर्धा संस्थेने परत सुरू कराव्यात कारण त्यामुळे सभासद शेतक-यांना संस्थेबद्दल आत्मियता वाटेल व ते अधिक उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करतील.

## संदर्भ ग्रंथ सूची

१) डॉ. कामत गो.स., सहकार-तत्व, व्यवहार व व्यवस्थापन, १९७९, विद्या प्रकाशन, पुणे-३०.

२) चिंचणकर आणि नामजोशी, को-ऑपरेशन अॅन्ड दी डायनॅमिक्स ऑफ चेंज, १९७७, सोमय्या पब्लिशिंग प्रा.लि., मुंबई.

३) चौबे बी.एन., प्रिन्सिपल्स अॅन्ड प्रॅक्टीस ऑफ को-ऑपरेटिव्ह बँकिंग इन इंडिया, १९६८, आशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई

४) भोसले आणि महाजन, सहकार तत्व आणि व्यवहार, १९८६, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५) माथूर बी.एस., को-ऑपरेशन इन इंडिया, १९७७,,साहित्य भवन, आग्रा.

६) मेमोरिया सी.बी., अॅग्रिकल्चरल प्रॉब्लेम्स ऑफ इंडिया, १९८४.

७) मोहन सराफ व शहा आर.एस., सहकार, सी. जमनादास आणि कंपनी, मुंबई.

८) प्रा. रायखेलकर ए.आर. व प्रा. अशोक डांगे, सहकार - तत्वे आणि व्यवहार, १९८९, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

९) श्रीमाल डब्ल्यु.सी., को-ऑपरेटिव्ह क्रेडिट इन प्लॅनिंग इरा प्रोग्रेस, प्रॉब्लेम्स अॅन्ड इमपॅक्ट, सोमय्या पब्लिशिंग प्रा.लि., मुंबई.

## अहवाल

१) इंडियन को-ऑपरेटिव्ह रीव्हयु, जानेवारी, १९८४.

२) आर.बी.आय. रिपोर्ट ऑन ट्रेड अॅन्ड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया - १९८४-८५ - सप्लीमेंट आर.बी.आय. बुलेटीन, सप्टेंबर, १९८५.